महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.१५५/२०२२/जाहिरात दिनांक: ११ नोव्हेंबर, २०२२

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : अधीक्षक, सामान्य राज्य सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) - अर्ज करण्यास मुदतवाढ**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक-०९०/२०२२**

शासनाच्या, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अधीक्षक, सामान्य राज्य सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) या संवर्गातील एकूण ६५ पदांच्या भरतीकरीता दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी (जाहिरात क्रमांक ०९०/२०२२) प्रसिध्द करण्यात आली होती.

**२.** प्रस्तुत संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार जाहिरातीमध्ये अनुभवाची तरतुद खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे:-

"Posses experience preferably in a supervisory capacity for not less than three years in a Government office or big establishment."

**३.** सेवा प्रवेश नियमातील उपरोक्त पर्यवेक्षकीय अनुभवाच्या संदर्भात शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक मागणी-३४२०/प्र.क्र.२६/प्रशा-२, दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ अन्वये अधीक्षक, सामान्य राज्य सेवा, गट-ब या संवर्गाची वेतनश्रेणी ६ व्या वेतन आयोगानुसार ६३००-३४८०० (४३०० ग्रेड पे) तसेच ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन बँड एस-१४ रु. ३८६००-१२२८०० अशी असल्यामुळे **समकक्ष अथवा निम्न वेतनश्रेणीतील पदावरील पर्यवेक्षकीय अनुभव ग्राह्य समजण्यात येईल,** असे आयोगास कळविण्यात आले आहे. यास्तव, प्रस्तुत शासन पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार संबंधित पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याकरीता अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

**४. पात्रता:-**

४.१ शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि वय गणण्याचा कालावधी तसेच इतर सर्व अटी व तरतुदी, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तपशीलवार मूळ जाहिरात क्रमांक ०९०/२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

**४.२ शैक्षणिक अर्हता आणि अनुभव दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ पर्यन्त ग्राह्य समजण्यात येईल.**

**५. अर्ज सादर करण्याचा तसेच परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी:-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक** | **दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

**६.** सदर शुध्दीपत्रक व मूळ जाहिरात क्रमांक ०९०/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.